# शिवतीर्थावरून..! भाग ५




*शिवतीर्थ - **निश्चयाचा महामेरू, बहुत जनांशी आधारू. अखंड स्थितीचा निर्धारू, श्रीमंत योगी.** - समर्थ रामदास स्वामी.*

## परोपकारी, सुस्वरूप व शिवाजी पार्कची Ambassador, स्मिता कन्नमवार

पूर्वी भाऊ मराठे सांगायचा, "*अरे जयु, हल्ली शिवाजी पार्कला एक फेरी मारायला कमितकमी एक तास लागतो. त्याचे कारण, आपल्या बालमोहन शाळेतील विद्यार्थी मित्रांचे आई-वडील भेटतात. अरे, इतक्या गप्पा मारतात की सोडतच नाहीत...*" मी म्हणालो, *"आणि त्यांना तुझा 'भाऊचा धक्का' देण्यात अधिक वेळ घालावीत असशील नां, मग तुला एक तास कसा पुरणार...?"* आज भाऊ आमच्यात नाहीये व मित्रांचे आई-वडीलही नाहीत हे दुर्दैव. परंतु, शिवाजी पार्कची आजची परिस्थिती कांही वेगळी नाहीये हे सुदैव. निदान मला तरी. सांगायचं म्हणजे, मी व वीणा मुंबईत गेल्यावर सकाळ-संध्याकाळ न चुकतां पार्कला एक तरी राउंड मारतो. फरक एवढा की, वीणाला ती फेरी मारतांना फक्त दहा मिनिटे व मला एक तास लागत होता..! त्याचे कारण सांगण्याची गरज नाही. असो.





***१) डावीकडून: सुहासताई, नातू आर्य, त्याचे वडील नितीन, पत्नी स्मिता व मोठा मुलगा कुंवार... २) सांदयकाळी शिवाजी पार्कच्या कट्ट्यावर आम्हाला भेटायला आले असतां. डावीकडून: मी, स्मिता, सरोज बावडेकर व सुहासताई... ३) तसेच, दुसऱ्या दिवशी आमच्या घरी खास माझा दुर्मिळ फोटोंचा संग्रह पाहण्यासाठी आले असतां. डावीकडून: सुहासताई, सरोजताई, स्मिता व मी.***

दुर्मिळ फोटोंचा संग्रह पाहून स्मिताने विचारले, *"हे फोटो कुणी प्रिंट केले आहेत? क्वालिटी अतिशय उत्कृष्ट आहे..." तुमच्या शेजारच्या शिवाजी पार्क फोटो स्टुडिओच्या विद्या वारीकने..." "काय म्हणतां, विद्याने..? अहो, ती माझी जिवलग मैत्रिण होती. कांही महिन्यापूर्वी अचानक वारली हे तुम्हाला कळलं कां...?"* ही शॉकिंग व दुःखद न्यूज ऐकून मी हादरलो..! मला हे माहित नव्हते. नंतर स्मिताने सर्व सांगितले ते ऐकून मला मनस्वी वाईट वाटले होते. शिवाजी पार्क फोटो स्टुडिओची नवी जागा कळल्यावर दुसऱ्या दिवशी मी प्रसादला भेटायला गेलो होतो. मला विद्याची कालच दुःखद बातमी कळली हे सांगितल्यावर प्रसाद म्हणाला, अहो, तुमचे बंधू येथे नियमित येत होते… असो.

जागतिक कीर्तीचे बॅडमिंटन खेळाडू नंदू नाटेकर हे आमचे कौटुंबिक व जुन्या दुर्मिळ गाण्यांच्या आवडीमुळे माझे स्नेही. पुण्याला जाणं जमणार नव्हतं म्हणून नंदूंना कांही पार्सल मला पाठवायचे होते म्हणून मी त्यांना फोन केला. ते म्हणले, *"जयंता, पोस्टाने पाठवूं नकोस, बालमोहन शाळेच्या मागे सुहास कन्नमवार राहतात त्यांना दे. मला ते घरपोंच मिळेल. तुला थोडा त्रास होईल, त्याबद्दल क्षमस्व.."* आणि दैवी चमत्कार घडला..! सुहास कन्नमवार म्हणजे राजकमल स्टुडिओचे सुप्रसिद्ध कॅमेरामन व विख्यात व्ही. शांताराम यांचे धाकटे भाऊ व्ही. अवधूत यांच्या या सुहासिनी मुलगी. आमच्या घरापासून त्या फक्त दोन पावलांवर रहातात. मी त्यांना नंदूंचे ते पार्सल दिलं व निघणार तोच सुहासताईंनी मला बसविले व माझी ओळख करून घेतली. आतून त्यांचा मुलगा नितीन, सुनबाई स्मिता, नातवंडं कुंवर व आर्य आली आणि ही सर्व मंडळी माझ्या पाया पडली. मी थोडा ओशाळलो होतो. परंतु, दोन मिनिटांची ती माझी भेट एक तास झाली होती. त्यातून मस्त चहा-कॉफी-नाश्ताही झाला होता. दरम्यान, वीणाचे मला एक सोडून तीनदां फोन आले. मी मनात नंदूंना त्रिवार वंदन केले आणि नाईलाजाने घरी परतलो.

मंडळी, नंतर या कन्नमवार कुटुंबियांशी आमचं नातं जुळलं व त्याचा नंदू नाटेकरांनाही मनस्वी आनंद झाला होता. असंच एकदां संध्याकाळी शिवाजी पार्कला फेरी मारून कट्ट्यामागील बांकड्यावर आम्ही बसलो असतां, मला सरोज बावडेकरांचा फोन आला व म्हणाल्या, *"अहो, तुम्ही मुंबईत आला आहात आणि मला कसं नाही कळविलंत, कुठं आहात..?"* आम्ही कुठे बसलो आहोत हे कळल्यावर म्हणाल्या, *"तुम्ही तेथेच बसा. आम्ही तुम्हाला भेटायला येतो..."* आणि पांच मिनिटांत सरोजताई, सुहासताई व त्यांची सून स्मिता आम्हाला भेटायला आलीत. अगदी देव दर्शनाप्रमाणे. आणि आमच्या चक्क एक तास मनोसोक्त गप्पा झाल्या व वेळ कसा निघून गेला ते कळले नाही. तेवढ्यात, जॉगिंग करणारा स्मिताचा धाकटा मुलगा आर्य पाठीमागून आला व आम्हाला वाकून नमस्कार करून पुढे निघून गेला. स्मिता ही अत्यंत सुग्रण आहे. (कऱ्हाडे ब्राह्मणांचा गुण). तसेच, स्मिताचा हा मुलगा आर्य सर्व प्रकारचे उत्तम

पदार्थ व जेवण करतो. त्याचे वडील नितीनही सर्व प्रकारचे उत्तम जेवण व निरनिराळे पदार्थ करतो. तो परदेशी टेनिस सामन्यात अंपायर म्हणून गेला की, त्याच्याबरोबरचा स्टाफ नितीनची आतुरतेने वाट पाहात असतात. कारण, एकच. नितीन हा नुसता श्रेष्ठ दर्जाचा अंपायरच नसून त्यावेळी तो सर्वांना निरनिराळे चविष्ट पदार्थही आनंदाने व प्रेमाने खायला घालतो. त्या व्यवसायात नितीन हा एकमेव भारतीय असून हे अभिमानास्पद आहे. आता US Open साठी नितीन प्रथमच प्रयत्नशील आहे. त्यासाठी निश्चित त्याची निवड होईल यात शंका नाही.




***१) लोअर परळ येथील 'महाराजा भोग' हे राजेशाही राजस्थानी व्हेजिटेरियन रेस्टॉरंट... २) त्याचा पोटभर आस्वाद घेतांना... ३) ते पाहूनच पोट भरणारे एकाच पोटात जाणारे अतिशय चविष्ट पदार्थ...***

गप्पांच्या नादात स्मिता म्हणाली, तुमचं मुंबईत काय पाहायचं, शॉपिंग करायचं व खायचं राहिलंय ते सांगा. काळजी व संकोच करू नका, मी तुम्हाला आनंदाने घेऊन जाईन. सध्या येथे फिरणं-चालणं म्हणजे धोक्याचं व कठीण आहे, त्यातून हा उन्हाळा व चिकचिकाट. आम्हाला खरेदी वगैरे कांहींच करायची नव्हती. फक्त कांही निवडक पदार्थ खायचे होते. ते कळल्यावर स्मिताने त्वरित आनंदाने अंगावर जबाबदारी घेतली व दर दिवशी वेळ काढून तिच्या प्रशस्त गाडीतून आम्हाला राजेशाही थाटात नव्या जागा दाखविल्या व भरपूर खायला घातलं. जे आम्ही मुंबईतील याआधीच्या आमच्या भेटीत कधीच अनुभवलं नव्हतं.

स्मिता ही मूळ सांगलीची. वडील हे सांगलीचे नामवंत सधन कारखानदार व प्रतिष्ठित व्यक्ती. आई ही माहेरची कऱ्हाडे ब्राम्हण. म्हणजे, आमच्या कुळातील. दुर्दैवाने १२वीत असतांना स्मिताला जो मरणाचा अपघात झाला त्यातून आईने अहोरात्र काळजी घेतल्याने तिला बरं व्हायला सुमारे एक वर्ष लागलं होतं. पुनर्जन्मच होता तो. अशा परिस्थितीत सायन्सला असूनही पुढे डॉक्टर व्हायचं तिचं स्वप्न, स्वप्नचं राहिलं. त्याचप्रमाणे अभ्यासाबरोबर हॉकी, मॅराथॉन व इतर खेळात प्राविण्य मिळूनही आयुष्यात कांहीच करतां येणं कठीण होऊन बसलं. यात नव्या मार्गाने पुढे जायला हवं म्हणून स्मिताच्या आईने दूरदृष्टीने स्मिताला आपल्या पायावर बस्तान बसविणारा व त्यावेळी अभिनव असलेला व्यवसायिक

ब्युटिशियनचा कोर्स करायला लावला. माझ्या मते योग्य असा तो कोर्स होता. कारण स्मिता ही सुस्वरूप असून तिची मोठी बहीण ही कॉलेजमध्ये ब्युटी क्वीन होती. त्यात स्मिताने उल्लेखनीय कामगिरी करून, प्रथम वर्गात येऊन सांगलीमध्ये स्वतःचं Fresh In नांवाचं ब्युटी पार्लर काढलं. आणि अडीअडचणींना प्रचंड तोंड देऊन त्या व्यवसायात स्मिताने अभिमानास्पद आणि कौतुकास्पद प्रगती केली. तिला अनेक पुरस्कार मिळाले व रेडियो-टीव्हीवर मुलाखती देऊन कर्तबगार स्मिताला कधीच मागे बघावं लागलं नाही.








***१) लोअर परेल येथिल फनिक्स मॉल... २) तेथिल सुप्रसिद्ध 'गजाली' रेस्टारंट. जेथे वीणा व स्मिताला व्हेजिटेरियन व मला उत्तम चविष्ट सी फूड खायला मिळालं... ३) त्या ‘ जाली’ रेस्टारंटची प्रशस्त जागा. या सर्व ठिकाणी आम्ही अमेरिकेत आहोत असा भास होत होता...***

१९९३ ला स्मिताचं नितीन कन्नमवारशी लग्न झालं आणि सांगलीच्या Fresh In ची कारकीर्द संपली. नितीन हा टेनिस जगात एक नामवंत रेफरी-अंपायर असून तो सर्व देशात डेव्हिस कप, विम्बल्डन, फेंच, ऑस्ट्रेलिया ओपनच्या व ऑलिम्पिक्स टेनिस स्पर्धेत रेफरी-अंपायर म्हणून मानाने जात असतो. लग्नानंतर स्मिताने नितीनच्या मावशीचे साधनाच्या 'स्वरूपा' या ब्युटी पार्लरमध्ये काम करू लागली. आणि २००६ला रानडे रोडवर (पश्चिम) जेथे पूर्वी बाळ ठाकरे व कामेरकर रहात होते त्याठिकाणी 'Vama' नांवाचं नांवाप्रमाणे सुंदर स्वतःचं बुटी पार्लर काढलं. Vama म्हणजे, 'सुंदर मादक ललना..!' या तिन्ही सौंदर्याचे पूर्णपणे मिश्रण असलेल्या Vamaचं नांव व उत्तम कार्य सर्व मुंबईत प्रसिद्ध असून स्मिताला त्या व्यवसायातून डोकं वर काढायला वेळ नसतो. स्मिता म्हणते, ‘वामा’ माझा अभिमान आहे. कदाचित ती जागा तिला आता अपुरी पडत असेल. आज शिवाजी पार्कचं लँडस्केप जरी बिघडलं असलं तरीही तेथे फिरणाऱ्या अनेक सुंदरी (बुरख्यावाल्या सुद्धा) पाहिल्या की मनात विचार येतो की, या सर्वांची काळजी निश्चित Vama घेत असेल...

मंडळी, कुठे काय चांगलं मिळतं याबरोबर स्मिताला मुंबईच्या कानाकोपऱ्याची इत्यंभूत माहिती आहे. मुंबईच्या आमच्या धांवत्या मुक्कामात स्मितामुळे आम्हाला अनेक चांगले शोध लागले. त्यात, प्रभादेवी येथे असलेल्या पुण्याच्या चितळे बंधूंच्या दुकानाचा शोध, अत्यंत महत्वाचा होता. त्यांच्या बाकरवडी व

आंब्याच्या बर्फीसाठी आम्हाला पुण्याला जावं लागलं नाही. तसं पाहतां माझा बालमित्र नवीन आंबुलकर त्याच्या नव्या मर्सिडीझ गाडीतून आम्हाला लोणावळा व पुण्याची सफर घडवून आणणार होता. परंतु, रात्र थोडी व सोंग फार अशी आमची अवस्था होती. असो. स्मिताची दोन्ही मुलं हुशार आहेत. मुलगा आर्य याला अमेरिकेत येऊन हॉटेल मॅनेजमेन्टमध्ये मास्टर्स करायचे आहे. मोठा मुलगा कुंवर हा ऑस्ट्रेलियात मास्टर्स करीत आहे. हल्ली मुंबईत काय किंवा अमेरिकेत काय खवैय्यांना तोटा नाही. कन्नमवारांनी जर एखादं हॉटेल काढलं तर, मला नवल वाटणार नाही. कारण धंद्याला असणारे सर्व गुण, प्रामाणिक व्यासायिक वृत्ती व त्यातील आवड त्यांना कधीच तोट्यात नेणार नाही.








***१) स्मित व नितीन... २) स्मिता आमच्या घरी आम्हाला भेट वस्तू द्यायला आली असतां... ३) शिवाजी पार्कला नांवाप्रमाणे सुंदर-मादक-ललना असलेलं स्मिताचं 'वमा' ब्युटी पार्लर..***.

स्मिताचं पब्लिक रिलेशन तर अफाट आहे. तिला कोण ओळखत नाही हा प्रश्नच आहे. अथवा ती सर्वांना ओळखते. थोडक्यात, शिवाजी पार्कची ती Ambassador च हे म्हणणे योग्य होय. कामाच्या व्यवसायातून एकही मिनिट वेळ नसतानाही आम्हाला म्हणते, "*काका-काकू पुढील खेपेला तुम्ही आमच्यासाठी कमीतकमी एक आठवडा तरी राखून ठेवा...*" त्यावर आम्ही तिला म्हटले, "*अग स्मिता, आता तुम्हीच सर्वजण न्यू यॉर्कला या. आम्हालाही तुमची थोडी सेवा करायला द्या...*" आमची व नितीनची भेट झाली नाही. तो बँकॉक व व्हिएतनामला टेनिसच्या डेव्हिस कपसाठी गेला होता. परंतु, आम्ही अमेरिकेला निघणार त्याच रात्री त्याच वेळी तो मुंबईत परतणार होता. त्यामुळे स्मिताने तिच्या मुलांसह आम्हाला एअरपोर्टला सोडले हते. मंडळी, सध्याच्या स्वार्थी जगात आपली माणसंही हे परोपकार व प्रेम करणार नाहीत. आम्ही खरंच नशीबवान आहोत.

माझे सर्व लेख स्मिता वेळ काढून वाचते व ते आवडल्याचा लगेच प्रतिसादही देते. (मंडळी, त्यावेळी पहाटेचे तीन वाजलेले असतात) आणि म्हणते, "*काका, अमेरिकेत बसून तुम्हाला शिवाजी पार्कमधील कसंहो हे सर्व कळतं? आम्हाला त्याचा शोध कसा लागत नाही..?.*" त्यावर मी तिला म्हणालो, "*अगं, मी*

*शरीराने  जरी येथे रहात असलो तरी, मनाने मी शिवाजी पार्कलाच रहात आहे. त्यातही मुंबईच्या भाऊगर्दीत लोकांना आजुबाजूलाही पाहायला वेळ नाहीये, नसतो. मी निवृत्त झालेला रिकामटेकडा माणूस आहे. त्यासाठीच शिवाजी पार्कची दुर्मिळ रत्ने शोधायला व मिळवायला जयंत विठ्ठल कुळकर्णीला अमेरिकेतून दरवर्षी मुंबईत यावे लागते. हा आनंदाचा व सुखी जीवनाचा भाग आहे. त्यामुळे माझं व माझ्या रसिक हितचिंतकांचं-वाचकांचं आयुष्यमान वाढतं असा माझा गोड तर्क आहे…"* आपणही त्याला सहमत असालच. असो. Well, आमची स्मिता झिंदाबाद व नंदू नाटेकरांना धन्यवाद..!

**(क्रमशः)**

**- जयंत कुळकर्णी**